(3) Report u/sec. 109 of Cr.P.C. (4) Report u/sec. 110 of Cr.P.C.

52. एक व्यक्ती वारंवार चोरीचा माल विकत घेत असते. त्या व्यक्तीविरुद्ध काय प्रतिबंधक कारवाई करावी ?
(1) मनाई हुकुमाचा दावा दाखल करणे
(2) सराईत गुन्हेगार घोषित करणे
(3) फौजदारी संहिता कलम 110 प्रमाणे अहवाल
(4) जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल

A person is in habit of purchasing stolen property. What preventive action should be taken ?
(1) File a suit for injunction
(2) Declare him habitual offender
(3) Report u/sec. 110 of Cr.P.C.
(4) Report to the collector

53. अचल मिळकतीतील जमीन व पाण्यासंबंधीचे शांततेस धोका निर्माण करणारे वाद कोठे चालतात ?

(1) कार्यकारी दंडाधिकारी (2) प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

(3) महानगर दंडाधिकारी (4) सत्र न्यायालय

Disputes of immovable property concerning land and water likely to cause breach of peace are tried by ?

(1) Executive magistrate (2) JMFC

(3) Metropolitan magistrate (4) Sessions court

---

54. सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने मिरवणुकीत शस्त्र नेण्यास बंदी घालण्याचा आदेश कोणाला देता येईल ?

(1) कार्यकारी दंडाधिकारी (2) सत्र न्यायालय

(3) जिल्हा दंडाधिकारी (4) दिवाणी न्यायालय

Who is empowered to prohibit arms in a procession for maintaining public peace and safety ?

(1) Executive magistrate (2) Sessions court

(3) District magistrate (4) Civil court

---

55. होऊ शकणाऱ्या दखलपात्र गुन्ह्यास पूर्ण क्षमतेने रोखण्याचा अधिकार कोणाचा आहे ?

(1) जिल्हाधिकारी (2) जिल्हा न्यायाधिश

(3) राजकीय नेता (4) पोलीस

Who is empowered to prevent to the best of his ability, commissioning of a cognizable offence ?

(1) Collector (2) District judge

(3) Political leader (4) Police

---

56. पोलीस तपासात आढळलेली खोटी वजनमापे कोणत्या तरतुदीने जप्त करता येतील ?

(1) फौजदारी संहिता कलम 152 प्रमाणे (2) फौजदारी संहिता कलम 153 प्रमाणे

(3) फौजदारी संहिता कलम 154 प्रमाणे (4) फौजदारी संहिता कलम 155 प्रमाणे

Under what provision will the police seize the false weights and measures found ?

(1) Sec. 152 of Cr.P.C. (2) Sec. 153 of Cr.P.C.

(3) Sec. 154 of Cr.P.C. (4) Sec. 155 of Cr.P.C.

---

57. नोंदविलेल्या दखलपात्र तक्रारीची नक्कल तक्रारदारास कशी दिली जाते ?

(1) नियमाप्रमाणे फी आकारून (2) तक्रारदाराच्या घरी नेऊन

(3) मोफत (4) नोंदणीकृत टपालाने

How is a copy of a registered cognizable offence is given to the complainant ?

(1) By charging prescribed fee (2) At the house of a complainant

(3) Free of cost (4) By registered post

---

58. दोषारोपपत्र पाठविल्यावर अधिक पुरावा मिळाल्यास त्याचे काय करावे ?
(1) अधिक पुराव्याकडे दुर्लक्ष करावे
(2) पुरावा पोलीस स्टेशनमध्ये ठेवावा
(3) पुरावा वरिष्ठांकडे सुपूर्त करावा
(4) पुरवणी दोषारोपपत्र पाठवावे

What should be done if an additional evidence is received after filing a chargesheet ?
(1) Neglect the additional evidence
(2) Keep the evidence in police station
(3) Hand over the evidence to the superior
(4) Send supplementary chargesheet

59. दखलपात्र व अजामीनपात्र गुन्ह्यात आरोपीने दरम्यांनचे काळात अटकपूर्व जामीन मिळविला आहे. त्याला पोलीस अटक करु शकतील काय ?
(1) नाही (2) होय
(3) कोर्टाच्या पूर्व परवनानगीने (4) पोलीस अधिक्षकाच्या परवानगीने

In a cognizable and non-bailable offence the accused has obtained ad-interim anticipatory bail. Can he be arrested by the police ?
(1) No (2) Yes
(3) With prior permission of the court (4) With permission of the S.P.

60. जामीनपात्र गुन्ह्यात आरोपीने जामीन देण्याची तयारी दाखविल्यास तो जामीनावर सुटु शकतो काय ?
(1) नाही (2) पोलीस कोठडीत जावे लागेल
(3) होय (4) न्यायालयीन कोठडीत जावे लागेल

In a bailable offence can the accused be released on bail if he is ready to give surety ?
(1) No (2) Remanded in Police custody
(3) Yes (4) Remanded in Magisterial custody

61. शस्त्रे म्हणजे काय ?
(1) शेती व घरगुती वापराकरिता बनविलेली वस्तू जसे की काठी
(2) चालतांना वापरायची काठी
(3) खेळण्याकरिता वापरल्या जाणारी आयुधे
(4) गुन्ह्याकरिता किंवा बचावा करिता बनविलेली किंवा आणलेली कोणतीही वस्तू तसेच बारूद, धारदार शस्त्रे व इतर भयानक अवजारें व शस्त्रे बनविण्याची मशीन किंवा मशीनचा भाग

Arms means
(1) article designed solely for domestic or agricultural uses, such as lathi
(2) ordinary walking stick
(3) objects incapable of being used otherwise than as toys
(4) article of any description designed or adapted for offences or defence and includes fire arms, sharpedged and other deadly weapons and part of and machinery for manufacturing arms

62. शस्त्र अधिनियम 1959 च्या कलम 3(2) अन्वये कोणतीही व्यक्ती एका वेळी, कितीपेक्षा अधिक अग्निशस्त्रे स्वत:च्या कब्जात ठेवू शकत नाही ?

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

As per the Section 3(2) of the Arms Act 1959 no person can keep more than ______ weapons in his personal possession at a time.

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

63. व्यक्ती निवडणूक गुन्ह्यासंबंधी अपराधी आहे असे केव्हा म्हणता येईल ?

(1) जेव्हा ना पसंतीचे उमेदवाराला मत देईल तेव्हा

(2) निवडणूक अधिकाऱ्याने त्याच्या अधिकारात लावलेली यादी, नोटीस किंवा इतर निवडणूक संबंधिचे दस्तऐवज एखादा व्यक्ती अप्रामाणिक हेतूने नष्ट करतो, पुसून टाकतो किंवा हलवितो तेव्हा

(3) नाव शोधण्याकरिता मतदार यादी पाहिल तेव्हा

(4) पोलिंग एजंट म्हणून काम करत असेल तर

A person shall be guilty of electoral offence if in any election he

(1) casts his vote in favour of a candidate not of his choice

(2) fraudulently defaces, destroys or removes any list, notice or other document. affixed by or under the authority of an election officer

(3) peruses the electoral roll to look for his name

(4) acts as a polling agent

64. लोकसेवकाची वर्तणूक केव्हा गुन्हेगारी गैरवर्तणूक संबोधता येईल ?

(1) जर तो भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वत:करिता किंवा इतरांकरिता मालमत्ता मिळवित असेल किंवा पैशाच्या स्वरूपात फायदा मिळवित असेल तर

(2) जर त्याने पावती देवून पैसे घेतले तर

(3) वैध मार्गाने मालमत्ता व उत्पन्न मिळवितो तेव्हा

(4) जर दुसऱ्याकडून कोणताही मोबदला न स्वीकारण्याचे कबूल केले तेव्हा

Criminal misconduct by a public servant means ______

(1) if he, by corrupt or illegal means obtains for himself or for any other person any valuable thing or pecuniary advantage

(2) if he accepts the money by issuing receipt

(3) if he receives income from lawful sources

(4) if he agrees to obtain nothing from any person

65. मॅट्रोपॉलिटन शहरे व विशेष पोलीस पथक दिल्ली यांचे अधिकार क्षेत्र सोडून इतर ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार कोणत्या पोलीस अधिकाऱ्यांना आहेत ?
(1) कमिशनर ऑफ पोलीस (पोलीस आयुक्त)
(2) पोलीस उपअधिक्षक
(3) हेड कॉन्स्टेबल
(4) सब इन्सपेक्टर (उपनिरीक्षक)

Who is authorized to investigate the offences outside the Delhi special police establishment and metropolitan areas under the provisions of the Prevention of Anti Corruption Act ?
(1) Commissioner of police
(2) Dy. superintendent of police
(3) Head constable
(4) Police sub inspector

66. भोजनगृह म्हणजे काय ?
(1) ज्या ठिकाणी लोक गोळा होवून प्रार्थनेकरिता जमतात ते प्रार्थना स्थळ
(2) जंगलामधील जागा जिथे सागवान लाकडे गोळा करण्यासाठी डेपो बनवितात ती जागा
(3) सार्वजनिक मनोरंजन गृह
(4) ज्या ठिकाणी लोकांना खाण्या पिण्या करिता अन्न व पेये पुरविली जातात व प्रत्येकाला प्रवेश असतो व अशा ठिकाणांमधे रिफ्रेशमेंट रूम, बोर्डिंग हाऊस, कॉफी हाऊस किंवा दुकान अंतर्भूत आहे जेथे लोकांना अन्न व पेये दिली जातात.

Eating house is
(1) Any place where public is admitted for worship, where prayer is offered
(2) Any place in forest area for the purposes of a depot for keeping teak wood
(3) Place of public entertainment
(4) Place where all people are admitted and where any kind of food or drink is supplied for consumption and includes a refreshment room, boarding house, coffee house or shop where any kind of food or drink is supplied to the public for consumption

67. पोलीस अधिकारी सतत कामावर हजर असतात असे केव्हा म्हटले जाते ?
(1) जेव्हा पोलीस अधिकारी सुट्टीवर असतात तेव्हा
(2) जेव्हा पोलीस अधिकारी निलंबित असतात तेव्हा
(3) जेव्हा पोलीस अधिकारी निवृत्त होतात तेव्हा
(4) मुंबई पोलीस कायद्यातील तरतुदींकरिता पोलीस अधिकारी नेहमीच कर्तव्यावर हजर असतात

When is it said that the police officers are always deemed to be on duty ?
(1) When police officers is on leave
(2) When police officer is under suspension
(3) When police officer is retired
(4) As police officer shall for all purposes of the Bombay Police Act are deemed to be always on duty

68. सार्वजनिक ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता व वाहतूक बाबत नियम व अधिसूचना काढण्याचे अधिकार कोणास आहेत ?

(1) पोलीस आयुक्त, जिल्हा दंडाधिकारी, पोलीस अधिक्षक
(2) पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हेडकॉन्स्टेबल, पोलीस कॉन्स्टेबल
(3) सरपंच, उपसरपंच, पंचायत सदस्य
(4) नायब तहसीलदार, महसूल निरीक्षक, तलाठी

With whom are the powers to make rules and regulations and issue a notice for traffic and preservation of order in public places ?

(1) Police commissioner, district magistrate and superintendent of police
(2) Police sub inspector, police head constable, police constables
(3) Sarpanch, up sarpanch, member of panchayat
(4) Naib tahsil dar, revenue inspector, talathi

---

69. व्यक्ती जेव्हा सार्वजनिक ठिकाणी लोकांमधे किंवा रस्त्यावर असभ्य वर्तन करत असेल तर त्यास मुंबई पोलीस कायद्यामधे शिक्षेची काय तरतूद आहे ?

(1) दंड 1,200 रु. पर्यंत
(2) सहा महिनेपर्यंत कैद व दंड रु. 500
(3) एक वर्षपर्यंत कैद व 1000 दंड
(4) एक महिना कैद

What punishment is prescribed under the Bombay Police Act for behaving indecently in public ?

(1) A fine which may be extended to rupees 1,200
(2) Imprisonment for six months and fine of Rs. 500
(3) Imprisonment for one year and at fine of Rs. 1,000
(4) Imprisonment for one month

---

70. मुंबई पोलीस कायदा कलम 130 अ प्रमाणे गुन्हा केला असे केव्हा म्हणता येईल ?

(1) रस्त्यावर खेळतांना आढळल्यास
(2) रस्त्यावर जुगार खेळतांना आढळल्यास
(3) रस्त्यावर निष्काळजीपणे वाहन चालवितांना आढळल्यास
(4) सार्वजनिक ठिकाणी कॅरम खेळ खेळतांना आढळल्यास

When is a person said to commit an offence punishable u/s 130 A of the Bombay Police Act ?

(1) When found playing on the street
(2) Gambling on the street
(3) Playing vehicle on road negligently
(4) Playing carrom in a public place

---

71. लोकसेवक जो अनुसूचित जाती व जमातीचा नसेल तर तो अनसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा 1989 प्रमाणे कोणत्या परिस्थितीत शिक्षेस पात्र होवू शकतो ?

(1) जेव्हा तो सदरचे कायद्याप्रमाणे वागत असेल तेव्हा
(2) जेव्हा तो या अधिनियमाखाली जी कर्तव्ये पार पाडणे आवश्यक असेल ती पार पाडण्यात जाणूनबुजून हयगय करील
(3) जेव्हा तो एखादे घटनेच्या वेळेस रजेवर असल्यास
(4) जेव्हा लोकसेवक अनुसूचित जाती व जमातीचा असून सुद्धा सदर कायद्यांचे तरतुदीचे पालन करीत नसल्यास

When a public servant not being a member of S.C. and S.T. is liable for punishment under the provisions of S.C. and S.T (P.O.A) Act 89.

(1) When he performs his duties under the said Act.
(2) When he wilfully neglects his duties required to be performed under the said Act
(3) When he is not on the duty at the relevant time
(4) When a public servant being member of S.C. and S.T. neglects his duties required to be performed.

72. जो कुणी अनुसूचित जाती किंवा जमातीचा नसतांना अनुसुचित जाती किंवा जमातीच्या व्यक्तीस खाण्याजोगा नसलेला किंवा किळसवाणा पदार्थ खाण्यास किंवा पिण्यास जबरदस्ती करतो तेव्हा त्याने काय अपराध केला ?

(1) भारतीय दंड संहिता कलम 294 प्रमाणे गुन्हा
(2) मुंबई पोलीस कायदा कलम 110 प्रमाणे गुन्हा
(3) मुंबई दारुबंदी कायदा अंतर्गत कलम 85 प्रमाणे गुन्हा
(4) कलम 3 (1) (i) अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) 1989 या कायद्या अंतर्गत गुन्हा

What offence is committed if a non-member of S.C. or S.T. forces a member of the S.C. or S.T. to drink or eat any inedible or obnoxious substance ?

(1) Offence punishable u/s 294 of the IPC
(2) Offence punishable u/s 110 of the Bombay Police Act
(3) Offence punishable u/s 85 of the Bombay Prohibition Act
(4) Offence punishable u/s 3 (1) (i) of the SC and ST (P.O.A) Act 1989

73. व्यसनाधीन म्हणजे

(1) व्यक्तीस चहा पिण्याचे व्यसन जडणे
(2) व्यक्तीस बीडी पिण्याचे व्यसन जडणे
(3) व्यक्ती मादक, नशीली, अमली आदी पदार्थांचे अधीन असणे
(4) तंबाखू सतत खात राहणे

An Addict means

(1) A person addicted to consuming tea
(2) A person addicted to smoking Bidi
(3) A person addicted to any narcotic drugs or psychotropic substances
(4) A person addicted to consuming tobacco

74. एन् डि पी एस कायद्यातील गुन्ह्याचा खटला हा
(1) प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात चालतो
(2) कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समोर चालतो
(3) विशेष न्यायिक दंडाधिकारी यांच्या समोर चालतो
(4) विशेष न्यायालयात चालतो

The offences under N.D.P.S. Act are triable by
(1) Judicial Magistrate First Class
(2) Executive Magistrate
(3) Special Judicial Magistrate
(4) Special Court

75. महा. स्टेट कंट्रोल ऑफ ऑरगनाईझड् क्राईम (महाराष्ट्र राज्य संघटित गुन्हेगारी नियंत्रण) कायद्या अंतर्गत आरोपीचा पोलीस अधिक्षकासमोर नोंदलेला कबुली जबाब हा त्याच्या विरुद्ध खटल्या मधे
(1) ग्राह्य धरण्यात येणार नाही
(2) ग्राह्य धरण्यात येईल
(3) पोलीस कबुली जबाब नोंदवू शकत नाहीत
(4) अशा प्रकारची तरतूद कायद्यात नाही

Confession made before a police superintendent under the provisions of Mah. State Control of Organized Crime Act is
(1) not Admissible in the trial
(2) admissible in the trial
(3) police cannot record a confession
(4) there is no such provision in the Act

76. महाराष्ट्र राज्य संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्या अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांचा तपास हा
(1) पोलीस उपनिरीक्षक करतात (2) पोलीस हेड काँस्टेबल करतात
(3) पोलीस निरीक्षक करतात (4) पोलीस उपअधिक्षक करतात

The investigation of an offence under the provisions of Mah. State Control of Organised Crime Act is carried out by
(1) Police sub inspector (2) Police head constable
(3) Police inspector (4) Dy. superintendent of police

77. महाराष्ट्र ठेविदारांच्या संरक्षण आधिनियमांच्या कोणत्या कलमाखाली वित्तीय संस्थेने ठेवी परत देण्यास कसूर केल्यास कारवाई करता येईल ?
(1) कलम 3 (2) कलम 6 (3) कलम 5 (4) कलम 4

Under which Sec. of the Maha. Protection of Int. of Depositors Act, action will be taken if financial establishment refuses to refund a deposit.
(1) Sec. 3 (2) Sec. 6 (3) Sec. 5 (4) Sec. 4

78. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 अंतर्गत माहिती या शब्दाची काय व्याख्या आहे ?

(1) म्हणजेच अंतर्भूत, डाटा, विषय, प्रतिमा, आवाज, बोलणे, सांकेतिक खुणा, संगणक कार्यक्रम, सॉफ्टवेअर व डाटा बेस किंवा मायक्रोफिल्म किंवा कॉम्प्युटर जनरेटेड मायक्रोफिल्म

(2) म्हणजेच की पेयर मधील की जिचा उपयोग डिजिटल सह्या तपासणी करिता केला जातो व जिचा अंतर्भाव डिजिटल सही तपासणी दाखल्या मधे अंतर्भूत आहे

(3) म्हणजेच कलम 24 खाली मिळालेला सर्टिफाईंग अथॉरिटीचा दाखला

(4) कलम 35 चे पोट कलम 4 प्रमाणे डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट म्हणजेच माहिती

How is information defined under the Information Technology Act 2000 ?

(1) Includes data, text, images, sound, voice, codes, computer programme, software and database or microfilm or computer generated micro films

(2) Means the key of a key pair used to verify digital signatures and listed in the digital signature certificate

(3) Means a licence granted by a certifying authority under Section 24 of the Act

(4) Digital signature certificate under subsection (4) of the Section 35 of the Act

---

79. कॉम्प्युटर हॅकिंग म्हणजे काय ?

(1) लोकांना किंवा एखाद्या व्यक्तीला नुकसान पोहचविण्याच्या उद्देशाने व जाणीवपूर्वक संगणकामधील माहिती नष्ट करणे, काढून टाकणे, बदलवून टाकणे किंवा त्याचे महत्त्व कमी करून उपयुक्तता नष्ट करणे व कोणत्याही मार्गाने संगणकास बाधा पोहचविणे

(2) संगणकाची चोरी करणे

(3) इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड

(4) कॉम्प्युटर नेटवर्क

Hacking with the computer system means

(1) whoever with the intention to cause or knowing that he is likely to cause wrongful loss or damage to the public or any person, destroys or deletes or alters any information stored in a computer resource or diminimises its value or utility or affects it by any means

(2) committing theft of computers

(3) electronic record

(4) computer network

80. जुगार अड्डा (कॉमन गॅम्बलींग हाऊस) म्हणजे काय ?
(1) हाऊस ऑफ कॉमन
(2) हाऊस ऑफ लॉर्डस्
(3) हाऊस जिथे खेळाचे पत्ते बनवितात
(4) कोणतेही ठिकाण, घर, खोली जिथे जुगार खेळला जातो किंवा जुगाराचे साहित्य वापरले जाते किंवा ठेवले जाते असे ठिकाण

Common Gambling House means
(1) House of commons
(2) House of lords
(3) House where playing cards are made
(4) Any house, room or a place whatsoever in which such gaming takes place or in which instruments of gaming are kept or used for such gaming

---

81. जुगार खेळतांना आढळून येणे व पक्षी किंवा जनावरे यांची विक्री, अशा परिस्थितीत पोलिसांना काय अधिकार आहेत ?
(1) अशा परिस्थितीत पोलिसांना कारवाई करण्याचे अधिकार नाहीत
(2) पोलीस सदर कृत्याकडे दुर्लक्ष करतील
(3) पोलीस अधिकारी असे कृत्य करू देतील
(4) पोलीस अधिकारी अशा कृत्यातील व्यक्तींना पकडतील व ठिकाणाची झडती बिना वारंट घेवून मालमत्ता जप्त करतील

What are the powers of police officers in the offences of gaming and selling, birds and animals ?
(1) In such cases police have no powers to take action
(2) The police officers may neglect such acts
(3) Police officer may allow such acts
(4) The police officers may apprehend the concerned and search the place without warrant and seize the objects

---

82. टु बॉटल या शब्दाचा अर्थ मुंबई दारुबंदी कायद्यामधे काय आहे ?
(1) खाद्य तेलाचा डबा
(2) डिस्टिल्ड वॉटर असलेली शिशि
(3) औषधाची बाटली
(4) पिंपा मधून पदार्थ भांड्यामधे, सुरईमधे, लहान शिशीमधे विक्रीसाठी बदलविणे, उत्पादन केले असो वा नसो अशी संपूर्ण प्रक्रिया

What is meant by "to bottle" as per the Mumbai Prohibition Act ?
(1) Container of edible oil
(2) Bottle containing distilled water
(3) A bottle containing medicine
(4) To transfer any article from a cask or other vessel to a bottle, jar, flask, pot or similar receptacle for the purpose of selling, whether any process of manufacturing has been employed or not

---

**83.** देशी दारु अंतर्भूत

(1) दारु भारताच्या बाहेरून आयात केलेली

(2) दारु नेपाळ मधे तयार केलेली

(3) भारतामधे तयार केलेली किंवा उत्पादित केलेली

(4) मोहा फुलाची शेती

Country liquor means

(1) liquor imported from out of India

(2) liquor manufactured in Nepal

(3) liquor produced and manufactured in India

(4) cultivation of Moha flowers

---

**84.** नागरिहक्काचे संरक्षण कायदा 1955 च्या कोणत्या कारणासाठी एखाद्या व्यक्तीने अस्पृश्यतेच्या ग्राऊंडवर एखाद्या व्यक्तीस आडकाठी केली तर शिक्षा होईल ?

(1) ट्रक मध्यें प्रवेश करण्यास

(2) देवळामध्यें प्रवेश करण्यास

(3) एखादे दुकान, सार्वजनिक खाणावळ, हॉटेल किंवा सार्वजनिक करमणुकीचे ठिकाण

(4) यापैकी काही नाही

A person is punished under the Protection of Civil Rights Act (1955), when he on the grounds of 'Untouchability' prohibits any one from

(1) entering in the truck

(2) entering in the temple

(3) entering any shop, public restaurant, hotel or place of public entertainment

(4) none of the above

---

**85.** अनुसूचित जातीच्या व्यक्तीचा अस्पृश्यतेच्या कारणांवरून अपमान करणे किंवा अपमान करण्याचा प्रयत्न करणे या गुन्ह्याला नागरी हक्क संरक्षण कायदा मधे शिक्षेची काय तरतूद आहे ?

(1) जन्म ठेपेची शिक्षा

(2) दहा वर्षे पर्यंत तुरुंगवास

(3) एक महिन्या पेक्षा कमी नाही व सहा महिन्या पेक्षा जास्त नाही अशी तुरुंगवासाची शिक्षा व शंभर रुपयांपेक्षा कमी नाही व पाचशे रुपयांपेक्षा जास्त नाही अशी दंडाची शिक्षा

(4) सदर कायद्यात शिक्षेची तरतूद नाही

What punishment is prescribed under the Provisions of the Protection of Civil Rights Act against a person who insults or attempts to insult a member of schedule caste on the grounds of untouchability ?

(1) Life imprisonment

(2) Imprisonment for ten years

(3) Imprisonment for a term which shall not be less than one month and not more than six months and a fine which shall not be less than one hundred rupees and not more than 500 Rs.

(4) No punishment is prescribed in the Act

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

86. जेव्हा बालक अटक केला जातो तेव्हा पोलीस स्टेशनच्या ठाणे अमलदारास हे कोणास कळविणे आवश्यक आहे ?
(1) त्याच्या मित्राला
(2) त्याच्या शाळेत
(3) त्याच्या जवळील शेजाऱ्यास
(4) त्याचे आई-वडील, पालक किंवा प्रोबेशन ऑफिसर

Whom should the officer incharge of police station must inform, when a juvenile is arrested ?
(1) To his friend
(2) To his school
(3) To the nearest neighbour
(4) To the parents, a guardian or probation officer of the juvenile

87. "बालगुन्हेगार" किंवा "लहान मुल" म्हणजे काय ?
(1) असा व्यक्ती कि ज्याने 18 वर्षे वयाचे पूर्ण केलेले नाहीत
(2) असे मुल कि ज्याने 1 वर्ष वयाचे पूर्ण केले नाही
(3) असा व्यक्ती कि ज्याने वयाची 21 वर्षे पूर्ण केली नाहीत
(4) असा व्यक्ती कि जो 18 वर्षाचे वयाचे वर आहे

"Juvenile" or "child" means
(1) a person who has not completed 18 years of age
(2) a child who has not completed one year of age
(3) a person who has not completed age of 21 years
(4) a person who is above 18 years of age

88. एखादा मानसिक रुग्ण हा आवश्यक त्या नियंत्रणाखाली नाही किंवा कुणी आवश्यक काळजी घेत नसेल किंवा मानसिक रुग्णास क्रूरतेची वागणूक आढळल्यास पोलिसांची काय कर्तव्ये आहेत ?
(1) अशा वेळेस पोलिसांनी ताबडतोब न्यायदंडाधिकारी यांचे कडे माहिती द्यावी ज्या न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात मानसिक रुग्ण राहत आहे
(2) पोलीस अधिकारी मानसिक रुग्णास अटक करतील
(3) पोलीस अधिकाऱ्यांना या परिस्थितीत काहीही अधिकार नाहीत
(4) दंड आकारतील

What is the duty of a police officer in case of a mentally ill person being cruelly treated or not being under proper care and control of any person ?
(1) The police officer shall forth with report the facts to the magistrate within whose jurisdiction the mentally ill person resides
(2) The police officer should arrest mentally ill person
(3) The police officer has no authority to look in to the matter
(4) Impose penalty

89. मोटार व्हेईकल अॅक्ट प्रमाणे 'ट्रान्स्पोर्ट वाहन' म्हणजे काय ?
   (1) सायकल
   (2) स्कूटर
   (3) विमान
   (4) लोकसेवा वाहन, मालवाहतूक कॅरेज, शैक्षणिक संस्था बस, किंवा खासगी सेवा वाहन

   What is 'transport vehicle' according to Motor Vehicle Act ?
   (1) A bicycle
   (2) A scooter
   (3) A airbus
   (4) A public service vehicle, a goods carriage or educational institutions bus or a private service vehicle

90. प्रवासी वाहन म्हणजे काय ?
   (1) ड्रायव्हर सोडून सहा प्रवाशांपेक्षा जास्त प्रवाशी वाहून नेण्याकरिता बनविलेले वाहन, तसेच भाड्याने देण्याकरिता किंवा बक्षिस देण्याकरिता किंवा वेगळे भाडे ठरवून पूर्ण प्रवासाकरिता किंवा टप्प्याच्या प्रवासाकरिता बनलेले वाहन
   (2) वाहन की जे मालवाहतुकीकरिता बनविलेले आहे
   (3) आर टि ओ ऑफिसने दिलेले परमिट
   (4) दुचाकी वाहन

   Stage carriage means
   (1) Motor vehicle constructed or adapted to carry more than six passengers excluding the driver for hire or reward or for fare either for the whole journey or for stages of the journey
   (2) A motor vehicle which is made to carry load
   (3) A road permit issued by the RTO office
   (4) Two wheeler

91. खाली नमूद प्रकरणांपैकी कोणत्या प्रकरणात 'स्त्री' पंच/अधिकारी असणे अनिवार्य नाही ?
   (1) महिला संशयीतेची झडती
   (2) मृत महिलेचा 'इन्क्वेस्ट' पंचनामा
   (3) पीडित व्यक्ती महिला आहे अशा घटनास्थळाचा पंचनामा
   (4) बलात्कारित महिलेची तपासणी

   In which of the following cases it is not essential to have a 'Lady' pancha / witness or a lady officer's presence
   (1) Search of a 'woman' suspect
   (2) Inquest Panchanama of a deceased 'woman'
   (3) Spot Panchanama where a 'woman' is a victim of the offence
   (4) Examination of a rape victim (woman)

92. इन्क्वेस्ट पंचनामा हा नेहमी ____________ केला जातो.
   (1) शवविच्छेदना पूर्वी (2) शवविच्छेदना नंतर
   (3) शवविच्छेदना वेळी (4) यापैकी नाही

   Inquest Panchanama is drawn
   (1) Before post mortem (2) After post mortem
   (3) At the time of post mortem (4) None of the above

93. अटक केलेल्या एखाद्या व्यक्तीने विनंती केल्यास त्याची वैद्यकीय तपासणी करून घेणे कोणत्या कलमान्वये अनिवार्य आहे ?

(1) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 53 (2) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 54

(3) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 51 (4) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 50

If an arrested accused requests for his medical examination, under what provisions is it mandatory to do so ?

(1) Section 53 of Cr. P.C. (2) Section 54 of Cr. P.C.

(3) Section 51 of Cr. P.C. (4) Section 50 of Cr. P.C.

---

94. महाराष्ट्र राज्यामध्ये विवक्षित इसमाविरुद्ध करण्यात येणारी हद्दपार कारवाई खालीलपैकी कोणत्या कायद्यानुसार करण्यात येते ?

(1) भारतीय दंड संहिता (2) भारतीय दंड प्रक्रिया संहिता

(3) भारतीय पुरावा कायदा (4) मुंबई पोलीस कायदा

In the State of Maharashtra which law provides for the externment proceedings ?

(1) I.P.C. (2) Cr.P.C.

(3) Evidence Act (4) Bombay Police Act

---

95. हद्दपार करण्यात आलेल्या इसमाने हद्दपारीच्या आदेशाचा भंग केल्यास त्याचे विरुद्ध कोणत्या कलम व कायद्याने गुन्हा होतो ?

(1) भारतीय दंड संहिता कलम 188 (2) सी.आर.पी.सी. कलम 142

(3) मुं.पो.का. कलम 37(1)(3) (4) मुं.पो.का. कलम 141, 142

A person against whom the externment orders have been passed commits breach of the orders then under which section and law it would be an offence ?

(1) I.P.C. u/s 188 (2) Cr.P.C. 142

(3) B.P. Act u/s 37 (1) (3) (4) B.P. Act u/s 141, 142

---

96. एखाद्या गुन्ह्याच्या तपासात खाली नमूद केल्यापैकी कोणती कृती करतांना पंचनामा करण्यात येत नाही ?

(1) गुन्ह्याच्या घटनास्थळाची तपासणी करणे

(2) आरोपी/संशयित इसमाची अंगझडती घेणे

(3) आरोपीचा 'कबुली जबाब' नोंदविणे

(4) भारतीय पुरावा कायदा कलम 27 प्रमाणे मेमोरंडम करणे

In which of the following acts during investigation of a crime, a Panchanama is not made ?

(1) Inspection of a scene of crime

(2) Search of a suspect/accused

(3) Confessional statement given by an accused

(4) Recovery memorandum under Evidence Act Section 27

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

97. एखाद्या इसमाचा पोलिसांच्या कोठडीत मुत्यु झाल्यास इन्क्वेस्ट पंचनामा व इतर चौकशीची कारवाई कोणी करावयास पाहिजे ?
(1) उपविभागीय पोलीस अधिकारी (संबंधित उपविभाग)
(2) सर्वात जवळचे कार्यकारी दंडाधिकारी
(3) गुन्हे अन्वेषण विभागाचे तपास अधिकारी
(4) पोलीस ठाणे स्वाधिन अधिकारी व दोन पंच

Who should do the inquest Panchanama and inquiry when there is a death of a person in police custody ?
(1) Sub-divisional police officer of the concerned sub-division
(2) The closest, executive magistrate
(3) Investigation officer of the state CID
(4) Incharge officer of the police station and two panch witness

---

98. खाली नमूद प्रकरणांपैकी कोणत्या प्रकरणी अपराध सिद्ध इसमास तडीपार करण्याची तरतूद मुं. पो. कायदा कलम 57 अंतर्गत नाही ?
(1) भारतीय दंड संहिता प्र. क्र. 12, 16, 17 खालील अपराध
(2) स्त्रीचा व मुली यांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्याचे अधिनियम क्र. 3, 4, 5 व 6
(3) एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम 27
(4) जुगार प्रतिबंधक अधिनियम क. 4 किवा 12(क)

In which of the following cases mentioned below, a convict can not be extermed under the Mumbai Police Act Section 57 ?
(1) Conviction under chapter 12, 16, 17 of the IPC
(2) Conviction under the Prevention of Immoral Traffic of Women and Girls Act Sec. 3, 4, 5, 6
(3) Section 27 of the NDPS Act
(4) Section 4 or 12 (C) of the Prevention of Gambling Act

---

99. आरोपीला बेड्या घालण्यापूर्वी पोलिसांनी कोणत्या अधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे ?
(1) तपासी अधिकारी (2) पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी
(3) न्याय दंडाधिकारी (4) कार्यकारी दंडाधिकारी

Before handcuffing the accused, prior permission of which officer is essential ?
(1) Investigating officer (2) Incharge officer of the police station
(3) Judicial magistrate (4) Executive magistrate

---

100. कोणत्या प्रसंगी स्त्रिया किंवा बालगुन्हेगारांना बेड्या घालता येतात ?
(1) खुनाच्या प्रकरणात अटक केलेल्या (2) पळून जाण्याच्या सवयीच्या
(3) मानसिक स्थिती सामान्य नसलेल्या (4) अशा गुन्हेगारांना कधीही बेड्या घालता येत नाहीत

When can a juvenile accused or a woman accused be fettered ?
(1) When arrested for a murder (2) Those habitual of escaping
(3) When of unsound mind (4) Such accused can never be fettered

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

Pick out the correct word to fill in the blank :

**Q. No. 201.** I congratulate you ____________ your grand success.

(1) for (2) at

(3) on (4) about

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) on" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र. क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्रीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

SEAL